ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 12 ]
Total No. of Printed Pages : 12 ]
ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 38 ]
Total No. of Questions : 38 ]

# A

# CCE RR

Question Paper Serial No. 600

येथून कापा.

ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : **85-M**

**Code No. : 85-M**

## ವಿಷಯ : ಸಮಾಜ ವಿಜ್ಞಾನ ( समाज विज्ञान )

## Subject : SOCIAL SCIENCE

**( ಮರಾಠಿ ಮಾಧ್ಯಮ / Marathi Medium )**

**( ಪುನರಾವರ್ತಿತ ಶಾಲಾ ಅಭ್ಯರ್ಥಿ / Regular Repeater )**

ದಿನಾಂಕ : 30. 06. 2022 ] [ Date : 30. 06. 2022
ಸಮಯ : ಬೆಳಗ್ಗೆ 10-30 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ–1-45 ರವರೆಗೆ ] [ Time : 10-30 A.M. to 1-45 P.M.
ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 80 ] [ Max. Marks : 80

**TEAR HERE TO OPEN THE QUESTION PAPER**
**प्रश्न पत्रिका येथून कापून उघडा.**

**विद्यार्थ्यांना सामान्य सुचना :**

1. प्रश्न पत्रिकेमध्ये बहुपर्यायी, वस्तुनिष्ठ, लघु उत्तरी आणि दीर्घ उत्तरी प्रकारचे 38 प्रश्न आहेत.
2. प्रश्न पत्रिका विरुद्ध बाजूच्या आच्छादनाने सील ( बंद ) करण्यात आली आहे. परीक्षा सुरू झाल्यावर उजव्या बाजूने कापून तुम्हाला ती उघडावयाची आहे. प्रश्न पत्रिकेमधील सर्व प्रश्न व्यवस्थित आहेत की नाहीत ते तपासून पाहा.
3. बहुपर्यायी, वस्तुनिष्ठ, लघु उत्तरी आणि दीर्घ उत्तरी प्रश्नांसाठी दिलेल्या सूचनांचे पालन करा.
4. उजव्या बाजूच्या कडेला ( काठावर ) असलेली संख्या पूर्ण गुण दर्शविते.
5. पेपरची उत्तरे सोडविण्यासाठी दिलेला जास्तीत जास्त वेळ प्रश्न पत्रिकेच्या पृष्ठावर वरील भागात दिलेला आहे. त्यामध्ये प्रश्न पत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटेही दिलेली आहेत.



**Tear here**

**I.** **खालील प्रत्येक प्रश्नाला किंवा अपूर्ण वाक्यांशाला चार बहुपर्यायी उत्तरे दिलेली आहेत. बरोबर असलेला पर्याय निवडून त्याच्या इंग्रजी मुळाक्षरासह पूर्ण उत्तर दिलेल्या उत्तर पत्रिकेमध्ये लिहा :** **8 × 1 = 8**

1. पहिल्या अँग्लो-मराठा युद्धानंतर हा पेशवा बनला –

   (A) नारायण राव

   (B) माधवराव-II

   (C) नाना फडणवीस

   (D) रघुनाथ राव.

2. आर्थिक निःसारणाच्या सिद्धांताचे ( Drain Theory ) वर्णन यांनी केले –

   (A) दादाभाई नौरोजी

   (B) महात्मा गांधी

   (C) ए. ओ. ह्यूम

   (D) बाळ गंगाधर टिळक.

3. या देशाने आपल्या परराष्ट्र धोरणात अलिप्तवादी धोरण स्विकारले –

(A) अमेरिका

(B) रशिया

(C) चीन

(D) भारत.

4. अन्नामलाई वन्यजीव अभयारण्य हे या राज्यात आहे –

(A) कर्नाटक

(B) केरळ

(C) तामिळनाडू

(D) तेलंगाणा.

5. एका वर्षाच्या मुदतीत त्या देशात उत्पादित झालेल्या वस्तू व सेवांची किंमत म्हणजे –

(A) दरडोई उत्पन्न

(B) विकास

(C) राष्ट्रीय उत्पन्न

(D) मानवी विकासाचे सूचक.

6. भारतात ग्राहक संरक्षण कायदा अंमलात आलेले वर्ष –

(A) 1962

(B) 1968

(C) 1976

(D) 1986.

7. ही एक महत्वाची महिला चळवळ आहे –

(A) मद्यपान प्रतिबंध चळवळ

(B) अस्पृश्यता प्रतिबंध चळवळ

(C) कामगार चळवळ

(D) शेतकरी चळवळ.

8. मजुरीरहित श्रमाचे एक उत्तम उदाहरण –

(A) रस्त्याच्या बाजूकडील व्यवसाय

(B) आपल्या आत्मसमाधानासाठी काढलेले चित्र

(C) कारखाण्यातील काम / श्रम

(D) शाळेतील शिक्षकांचे श्रम.

**II. खालील दिलेल्या प्रत्येक प्रश्नाला प्रत्येकी एका वाक्यात उत्तर लिहा : 8 × 1 = 8**

9. जागतिक ग्राहक चळवळीच्या इतिहासात 15 मार्च 1962 हा दिवस का महत्वाचा आहे ?

10. उष्ण कटिबंधातील पानझडी अरण्यांना 'मान्सून अरण्ये' असे का म्हणतात ?

11. चिपको चळवळीचा मुख्य परिणाम कोणता ?

12. उन्हाळा ऋतूवेळी भारतात जास्त उष्णता असण्याचे कारण कोणते ?

13. सहाय्यक सैन्य पद्धत कोणी अंमलात आणली ?

14. कोणत्या तहाने दुसरे अँग्लो-म्हैसूर युद्ध संपुष्टात आले ?

15. 1962 साली भारतावर हल्ला केलेले शेजारिल राष्ट्र कोणते ?

16. 'खेड्यांचा ( ग्रामीण ) विकास हाच भारताचा खरा विकास' असे कोणी म्हटले ?

**III. खाली दिलेल्या प्रत्येक प्रश्नाला दोन ते चार वाक्यात / मुद्यात उत्तर लिहा :**

**8 × 2 = 16**

17. बक्सारच्या लढाईचे परिणाम लिहा.

18. 1961 साली गोवा पोर्तुगीजांपासून कसा स्वातंत्र्य झाला ?

19. भारताच्या परराष्ट्र धोरणावर कोणत्या घटकांचा प्रभाव पडला ?

**किंवा**

दुस-या जागतिक महायुद्धानंतर उद्‌भवलेल्या प्रमुख समस्या कोणत्या ?

20. असंघटित क्षेत्रातील कामगारांपुढील आव्हानांची यादी तयार करा.

**किंवा**

महत्वाच्या पर्यावरण चळवळींची यादी तयार करा.

21. भारताचे प्रमुख स्वाभाविक विभाग कोणते ?

22. मातीची धूप होण्याची कारणे कोणती ?

23. आर्थिक विकासाचे उद्देश लिहा.

24. बँक खात्यांचे प्रकार कोणते ?

**IV. खालील प्रश्नांची प्रत्येकी सहा वाक्यात / मुद्यात उत्तरे लिहा : 9 × 3 = 27**

25. ब्रिटिश शिक्षणाचा भारतीयांच्यावर कसा प्रभाव पडला ?

**किंवा**

संगोळ्ळी रायाण्णाने ब्रिटिशांविरुद्ध कसा लढा दिला ?

26. आर्य समाजाचे उद्देश कोणते ?

27. 1857 चे बंड काही कारणांमुळे अपयशी ठरले. का ?

28. रशियाबरोबर असलेल्या भारताच्या संबंधाचे वर्णन करा.

29. अस्पृश्यतेच्या निर्मूलनासाठी स्वातंत्र्य भारताने हाती घेतलेले उपाय कोणते ?

30. उद्योगधंद्याच्या स्थायीकरणावर प्रभाव पाडणारे घटक कोणते ?

**किंवा**

एका देशाच्या विकासासाठी वाहतूकीचे महत्व स्पष्ट करा.

31. महापूराचे परिणाम कोणते ?

32. उत्पादक घटकांच्या पुरवठ्यातील बदलांची कारणे कोणती ?

**किंवा**

पंचायत राज व्यवस्थेची प्रमुख लक्षणे कोणती ?

33. बँकेची कार्ये लिहा.

**किंवा**

उद्योजकांची वैशिष्ट्ये लिहा.

**V. खालील प्रत्येक प्रश्नाचे आठ वाक्यात / मुद्यात उत्तर लिहा :** **4 × 4 = 16**

34. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील सुभाषचंद्र बोस यांची भूमिका स्पष्ट करा.

35. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासातील विविध आदिवासीं चळवळींचे वर्णन करा.

**किंवा**

भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील जहालमतवादींची भूमिका स्पष्ट करा.

36. महिलांचा दर्जा सुधारणेसाठी सरकारने हाती घेतलेले उपाय कोणते ?

37. भारतात प्रचलित असलेल्या विविध शेतीच्या प्रकारांची यादी तयार करा.

**VI. 38. भारताच्या नकाशाचा आराखडा काढा आणि त्यामध्ये खालील ठिकाणे दाखवा :**

**1 + 4 = 5**

a) 82 $\frac{1}{2}$ पूर्व रेखांश

b) नर्मदा नदी

c) न्यू मंगळूर बंदर

d) भाक्रा नानगल योजना.

**अंध विद्यार्थ्यासाठी पर्यायी प्रश्न : ( प्रश्न संख्या 38 च्या ऐवजी )**

नदी खो-यातील बहुउद्देशीय योजनेचे प्रमुख उद्देश कोणते ? **5**